**PROFIT ADVERTISERS (INDIA) Pvt. Ltd.**

## PRESS CLIPPING

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Client | Agrovision [2nd Day) | | | | |
| Publication | Sakal Agrowon | | | | |
| Language | Marathi | Place | Nagpur. | Date | 13/11/16 |

# कृषी विकासाचा गुजरात पॅटर्न देशभर राबवण्यासाठी पंतप्रधान आग्रही

## गुजरातचे मुख्यमंत्री विजय रूपानी; 'अॅग्रो व्हिजन' कृषी प्रदर्शनात कार्यशाळांचे उद्‌घाटन




**नागपूर : येथे आयोजित 'अॅग्रो व्हिजन' कृषी प्रदर्शनात आयोजित कार्यशाळांच्या उद्‌घाटनप्रसंगी गुजरातचे मुख्यमंत्री विजय रूपानी यांनी मार्गदर्शन केले.**

**नागपूर (प्रतिनिधी) :** देशातील कृषीला दिशादर्शक असा पॅटर्न गुजरातचे मुख्यमंत्री असताना नरेंद्र मोदी यांनी राबविला. तब्बल तेरा वर्ष ते गुजरातचे मुख्यमंत्री होते.

त्यांच्यामुळेच गुजरातचा कृषी विकास दर १७ टक्क्यांपर्यंत पोचला. कृषी विकासाचा हाच पॅटर्न देशभरात राबविण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आग्रही आहेत, असे प्रतिपादन गुजरातचे मुख्यमंत्री विजय रूपानी यांनी केले.

'अॅग्रो व्हिजन' कृषी प्रदर्शनातील कार्यशाळांचे उद्‌घाटन मुख्यमंत्री रूपानी यांच्या हस्ते शनिवारी (ता.१२) झाले. या वेळी ते बोलत होते. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय उद्योग राज्यमंत्री गिरीराज सिंह या वेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री विजय रूपानी म्हणाले, की गुजरातचे मुख्यमंत्री असताना नरेंद्र मोदी यांनी कृषी विकासाला पूरक योजना राबविण्यावर भर दिला. त्यामध्ये शेतकऱ्यांचा शेतमाल राज्यातील कोणत्याही विमानतळावरून परदेशात नेण्याच्या महत्त्वाकांक्षी उपक्रमाचा समावेश आहे. शेतकऱ्यांच्या खात्यात थेट अनुदान जमा करण्याची अंमलबजावणी

काही वर्षांपूर्वीच गुजरातमध्ये झाली. यामुळे कृषी योजना अनुदान वितरणातील गैरप्रकार रोखण्यात बऱ्याच अंशी यश आले. गुजरातमधील ३८ लाख शेतकऱ्यांना तीन लाख रुपयांपर्यंतचे कर्ज एक टक्के व्याजदराने देण्यात आले. बॅंकेच्या प्रचलीत उर्वरित व्याजदराचा भरणा सरकारने केला. अशाप्रकारच्या योजनांमधून शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न झाला. २०१४-१५ या वर्षात गुजरातचे एकूण कृषी उत्पादन २ लाख २२ हजार टन होते. त्यात वाढ होत गेल्या वर्षी ते १ हजार ९०० कोटींवर गेले आहे.

भुईमूग उत्पादनात गुजरातचा प्रथम क्रमांक लागतो. निर्यातीवर भर, शेती संशोधन, लॅंड टू लॅबोरेटरी यांसारख्या योजना राबवल्याने गुजरातमधील कृषीक्षेत्राचा कायापालट झाला आहे. अहमदाबाद येथे ई-रेडिऐशन सेंटर सुरू करून कृषी मालाची टिकवण क्षमता वाढविण्याचा प्रयत्न केला गेला. त्यामुळे निर्यातवाढीला चालना मिळाली. येत्या काळात बायोटेक्नॉलॉजी व वेस्ट इन टू बेस्ट तंत्रज्ञानाचा वापर करून गुजरातचा विकास साधला जाईल. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा बायो सीएनजी प्रकल्प गुजरातमध्ये राबवून शेतकऱ्यांना पुन्हा रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

या वेळी गिरीराज सिंह म्हणाले, की भारताची लोकसंख्या जगाच्या १७.५ टक्के आहे. २.५ टक्के जमीन आणि ४.२ टक्के पाणी आहे. त्यामुळे पाणी व्यवस्थापन हा महत्वाचा मुद्दा ठरतो. तांदूळ, गहू, मका या पिकांच्या प्रतिकिलो उत्पादनासाठी ७०० ते १००० लिटर पाणी लागते. याच पिकांची लागवड सर्वाधिक होते. त्यामुळे भविष्यातील धोके ओळखत पाण्याचे योग्य व्यवस्थापन करण्यावर भर दिला पाहिले. देशात हिरव्या चाऱ्याची ४६ टक्के कमतरता आहे. ती भरून काढण्यासाठी नवीन प्रयोग झाले पाहिजेत.

### 'थेट विमानतळावर शेतमाल पोचवण्यासाठी हवी सोपी व्यवस्था'

देशात गुजरात व मध्य प्रदेशाचा कृषी विकास दर सर्वाधिक आहे. त्यांचाच आदर्श जपण्याची गरज आहे. त्यांच्या चांगल्या प्रयोगांची अंमलबजावणी महाराष्ट्रात व्हायला हवी. गुजरातच्या धर्तीवर थेट विमानतळावर शेतमाल पोचविण्यासाठी सोपी व्यवस्था असावी. त्यासाठी राज्य सरकारने प्रत्येक विमानतळालगत पाच एकर जागा शेतमाल निर्यातीसाठी उपलब्ध करून द्यावी. सिंचनाचे बजेट एका वर्षासाठी ४० हजार कोटींचे करावे, असे मत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केले.